महाराष्ट्र शासन
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय.
जुना आग्रा रोड, अरण्य संकुल, आदिवासी विकास भवन समोर, नाशिक ४२२ ००२.
दूरध्वनी क्र.०२५३-२५९८५४५. ई-मेल- ccfnashik२०१२@gmail.com

जा.क्र. :कक्ष-2/जमिन/प्र.क्र.08/2021-22/ 323 /सन 2022-23 दिनांक :- 05/06/2023

पत्र

प्रति,

**मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य, नागपुर**

**विषय :-** **वनजमीन- नाशिक**
**बोरीपाडा-लघुसिंचन तलावासाठी ९.१९ हे. वनजमीन वळती करणेबाबत**

**संदर्भ :-** 1) आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-17/2/नोडल/नाशिक/आयडी-12924(15)/41, 2023-24, दिनांक 05/04/2023
2) उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन/ कॅम्पा/315, दिनांक 19/05/2023

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद संधारण विभाग नाशिक यांचे कडील लघु पाटबंधारे तलाव बोरीपाडा करीता वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत 9.19 हेक्टर वनजमीन वळतीकरण प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. सदरहु प्रस्तावाच्या अनुषंगाने आपले कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये 1 ते 3 त्रुटयांची पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले आहे त्यानुसार उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांनी संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये 1 ते 3 त्रुटयांचे पुर्ततेबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

| अ.क्र. | त्रुट | पुर्तता |
|---|---|---|
| १ | KML CD मध्ये प्रस्तावित केलेल्या क्षेत्राच्या Properties नमुद केलेल्या नाहीत. (जसे वनविभागाचे नाव, वनक्षेत्राचे नाव, वनपरिमंडळ, बिटाचे नाव, सर्व्हे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार इत्यादी.) | KML CD मध्ये प्रस्तावित केलेल्या क्षेत्राच्या Properties मध्ये वनविभागाचे नाव, वनक्षेत्राचे नाव, वनपरिमंडळ, बिटाचे नाव, सर्व्हे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार इत्यादी. नमुद करण्यात आलेले असून सोबत नवीन KML CD सादर करण्यात येत आहे. |
| २ | विळवंडी गावाचा नकाशा सादर केलेला आहे त्यामध्ये समाविष्ट सर्व्हे क्रमांक २४७ अंतर्गत गट क्रमांक ४७६, ४७७, ४९९ व ५२६, ५२७, ५२८, ५२९ च्या सिमा गट क्रमांक निहाय सुस्पष्ट पणे दर्शविल्या गेलेल्या नाहीत त्या दर्शविण्यात याव्या. तसेच गट क्र. ५२४ चा जो ७/१२ उतारा सादर केलेला आहे तो प्रस्तावित केलेल्या पर्यायी वनीकरण क्षेत्राच्या व्यतिरिक्त असल्याचे स्पष्ट होते. सदर ७/१२ उता-याच्या प्रस्तावित केलेल्या वनीकरण क्षेत्राबाबत काय संबध आहे याबाबत स्पष्ट खुलासा सादर करावा. | विळवंडी गावाचा नवीन नकाशा सादर करण्यात येत असून त्यामध्ये कंपार्टमेंट नंबर २४७ अंतर्गत येणारे पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित गट क्रमांक ४७६, ४७७, ४८१, ४८२, ४९९ व ५२६, ५२७, ५२८, ५२९ च्या सिमा गट क्रमांक निहाय सुस्पष्ट पणे दर्शविण्यात आल्या आहेत. गट क्र. ५२४ चा जो ७/१२ उतारा सादर केलेला आहे तो प्रस्तावित केलेल्या पर्यायी वनीकरण क्षेत्राच्या व्यतिरिक्त असून पर्यायी वनीकरण क्षेत्राबाबत संबधित नाही. सोबत संबधित गट क्र. ४८१ व ४८२ चे ७/१२ उतारे सादर करण्यात येत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ३ | गुगल अर्थ वरील प्राप्त नकाशा पर्यायी वनीकरणाकरीता दर्शविण्यात आलेल्या क्षेत्राबाबत संदर्भ सुची मध्ये उल्लेख केलेला नाही. तो दर्शविण्यात येऊन त्यामध्ये संपुर्ण Properties जसे वनविभागाचे नाव, वनक्षेत्राचे नाव, वनपरिमंडळ, बिटाचे नाव, सर्व्हे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार इ. नमुद करण्यात याव्यात. | गुगल अर्थ वरील नवीन नकाशात पर्यायी वनीकरणाकरीता दर्शविण्यात आलेल्या क्षेत्राबाबत संदर्भ सुची मध्ये संपुर्ण Properties जसे वनविभागाचे नाव, वनक्षेत्राचे नाव, वनपरिमंडळ, बिटाचे नाव, सर्व्हे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार इत्यादी बाबी नमुद करण्यात आलेल्या असून नकाशे सोबत सादर करण्यात येत आहेत. |

तरी प्रस्ताव मंजुरी विषयी पुढील कार्यवाही आपले स्तरावरुन व्हावी हि विनंती

सोबत :- वरीलप्रमाणे

(जी.मल्लीकार्जुन)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

**प्रतिलिपी :-** उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतिलिपी :-** जिल्हा जल संधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.